**आकाशवाणी पुणे**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक – 09/06/2024** **वार – रविवार**

---

**मोहोळ**

भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते आणि काळजीवाहू पंतप्रधान नरेंद्र मोदी, देशाचे पंतप्रधान म्हणून सलग तिसऱ्यांदा आज शपथ घेणार आहेत. नवी दिल्लीत राष्ट्रपती भवनाच्या प्रांगणात थोड्याच वेळात हा शपथग्रहण सोहळा होणार आहे. यावेळी मंत्रिमंडळातल्या सदस्यांचाही शपथविधी होणार आहे. पुण्याचे नवनिर्वाचित खासदार मुरलीधर मोहोळ यांनाही केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्रीपदाची संधी मिळणार आहे, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज माध्यमांशी बोलताना सांगितल. एका साध्या कार्यकर्त्यापासून केंद्रीय मंत्र्यापर्यंतचा हा प्रवास हा आपल्यासाठी स्वप्नवत आहे, आपलं मंत्रिपद हा प्रत्येक पुणेकरांचा सन्मान आहे अशी भावना खासदार मोहोळ यांनी व्यक्त केली आहे.

**पुरस्कार**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने देण्यात देण्यात येणाऱ्या यशस्विनी पुरस्कारांची घोषणा खासदार सुप्रिया सुळे यांनी आज केली. लेखिका मीनाक्षी पाटील, पर्यावरण क्षेत्रातील कार्यकर्त्या कलावती सवंडकर, सामाजिक कार्यकर्त्या रुक्मिणी नागापुरे, पत्रकार संध्या नरे पवार आणि उद्योजिका राजश्री गागरे आणि नेमबाजी क्रीडा प्रकाराच्या प्रशिक्षक श्रद्धा नलमवार यांना हे पुरस्कार जाहीर झाले आहेत. माजी खासदार अनु आगा आणि खासदार शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत येत्या २२ तारखेला पुण्यात या पुरस्कारांचं वितरण करण्यात येणार आहे. राज्यातील सामाजिक, साहित्य, कृषी, पत्रकारिता, उद्योजकता, क्रीडा प्रशिक्षण क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सहा जणींची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. राज्य शासनाने जाहीर केलेल्या महिला धोरणाला २२ जून रोजी ३० वर्षे पूर्ण होत आहेत. त्या दिवसाचे औचित्य साधून या कार्यक्रमाची आखणी करण्यात आली आहे.

**Pcmc**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये उद्या सकाळी १० ते १२ या वेळेत जनसंवाद सभा होणार असल्याची माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली. लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता संपुष्टात आली असल्याने या जनसंवाद सभा नियोजित दिवशी आयोजित केल्या जाणार आहेत.

**शिस्तभंग**

लोकसभा निवडणूक प्रक्रिया सुरु असताना पुण्याचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांच्यावर बेछूट आरोप करून करुन त्यांच्या बदलीची मागणी करणारे उपजिल्हाधिकारी आणि खेडचे प्रांत, जोगेंद्र कट्यारे यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयानं राज्य शासनाकडं पाठवला आहे. मतमोजणीला दोन दिवस उरले असताना कट्यारे यांनी जिल्हाधिकाऱ्यांविरुद्ध जाहीर आरोप करून थेट केंद्रीय निवडणूक आयोगाकडे त्यांच्या बदलीची मागणी केली होती.

**महापालिका-**

पुण्यातील लष्करी आस्थापनाजवळच्या नागरी वसाहतीत तुंबून राहणाऱ्या पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी महापालिका प्रशासन लष्कराची मदत घेणार आहे. महापालिका आयुक्तांनी त्यासंदर्भात वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांशी चर्चा करून मार्ग काढण्याच्या सूचना आपल्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

**धंगेकर**

पुण्यात काल संध्याकाळी झालेल्या मुसळधार पावसामुळे शहरातल्या अनेक रस्त्यांवर पाणी साचलं तसंच वाहतूकही विस्कळीत झाली, याला पुणे महानगरपालिकाच जबाबदार असल्याचा आरोप आमदार रवींद्र धंगेकर यांनी केला आहे. एका दिवसाच्या पावसात स्मार्टसिटीची अक्षरशः दाणादाण उडाली असल्याचा आरोप धंगेकर यांनी केला आहे.

**क्षय रोग औषध**

राज्यात गेल्या सहा महिन्यापासून क्षयरोगावरील औषधांचा तुटवडा जाणवत आहे. मात्र आता केंद्र सरकारनं राज्याला क्षयरोगावरील अतिरिक्त औषधं पुरवली आहेत. ही औषधं आता जिल्हयांना वितरित केली जाणार आहेत, अशी माहिती क्षयरोग आणि कुष्ठरोग विभागाचे उपसंचालक डॉ. संदीप सांगळे यांनी दिली.

**बाजार समिती**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रसह विविध राज्यातून 80 ते 90 ट्रक फळभाज्यांची आवक झाली. राज्यात सर्व दूर पाऊस झाल्याने आवक घटली असून कांदा, सिमला मिरची, हिरवी मिरची, काकडी, फ्लॉवर महागले आहेत. पावसाचा फटका बसल्याने पालेभाज्यांचे भाव कडाडले आहेत. फळेही महागली फुल बाजारात मंदीचं वातावरण आहे.

**टेबलटेनिस**

पुण्यात झालेल्या जिल्हा मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत मुलींच्या १९ वर्षाखालील गटात नैशा रेवसकर हिने विजेतेपद पटकावलं. तिने यापूर्वी १५ आणि १७ वर्षाखालील गटातही अजिंक्यपद मिळवलं होतं. त्यामुळे तिला तिहेरी मुकुटाचा मान मिळाला. मुलांच्या 19 वर्षाखालील गटात नील मुळ्ये विजेता ठरला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज दिवसभर ढगाळ हवामान आहे. काल झालेल्या मुसळधार पावसामुळे कमाल तापमान मोठी घट झाली असून आज कमाल तापमान 30 अंशांच्या आसपास होतं. उद्याही शहरात हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज आहे.

दरम्यान पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला, वरसगाव, पानशेत आणि टेमघर धरण परिसरात गेल्या काही दिवसात मान्सून पूर्व पावसाने हजेरी लावली आहे. काल खडकवासला इथं पन्नास मिलीमीटर पाऊस पडल्याची नोंद झाल्याचं वृत्त संस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी ०६.०० वाजता, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**